**तारापूर एज्युकेशन सोसायटी, तारापूर, जि.ठाणे**

**वार्षिक अहवाल**

**दि.१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२०**

सन्माननीय सभासद बंधु - भगिनींनो,

तारापूर एज्युकेशन सोसायटी व तिच्या विद्यमाने सुरू असलेल्या रा.हि.सावे (माध्यमिक व प्राथमिक),संस्थेची गोपाळ शिवराम वर्वे पूर्व प्राथमिक शाळा, संस्थेची इंग्रजी माध्यमाची न्युक्लिअर फेंड्स् इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच ह.दा.(भाऊसाहेब) सावे विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांचा सन २०१९ - २०२० या वर्षाचा अहवाल व सनदी हिशोब तपासणीसांनी जमाखर्च स्थायी समितीच्या वतीने आपणांस सादर करीत आहोत.कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे सन २०१९-२० ची वार्षिक सर्वसाधारण सभा घेता आली नाही. त्यावर संस्थेच्या दि.२६.०९.२०२१ रोजी होणा-या आभासी वार्षिक सर्वसाधारण सभेत विचारविनिमय करून तो सर्वानुमते मंजूर करावा ही नम्र विनंती.

संस्थेच्या चालू वर्षातील दिवंगत सभासद व सन्माननीय व्यक्ती

| | |
|---|---|
| १. श्रीमती प्रेमा लक्ष्मण चुरी | |
| १. श्री.हेमंत नारायण वर्तक | २८.०१.२०२० |
| २.कै.श्री.वसंत भास्कर करवीर | ७.०३.२०२० |
| ३. कै.श्री.अजित भास्कर चुरी | ११.०७.२०२० |
| ४.कै.श्री.सुधाकर यशवंत पाटील | २७.०७.२०२० |
| ५.श्री.रमेश आबाजी सावे | ०८.१०.२०२० |
| ६. श्री.दत्तात्रेय जगन्नाथ सावे | २७.०९.२०२० |

वरील दिवंगत सन्माननीय व्यक्तीस संस्था श्रद्धांजली वाहत आहे.

# सभा

अहवाला साली स्थायी समितीच्या ४ व शालेय समितीच्या प्रत्येकी ६ सभा झाल्या. तसेच विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या ६ व इंग्रजी माध्यमाच्या ६ सभा झाल्या. सदर सभांमधून संस्थेच्या शाळा व कॉलेजच्या कामकाजावावत , विविध उपकमांवावत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसंदर्भात करावयाच्या उपाययोजना वावत सविस्तर विचारविनिमय करून संस्था व शाळा कॉलेजच्या हिताच्या दृष्टीने महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

१ .परितोषिक निधी :-

संस्थेकडे ३१ मार्च २०१९ अखेर रु.७,९५,४५८/- इतका पारितोषिक निधी होता. त्यात अहवालासाठी ३१ मार्च २०२० अखेर रु.२५000/- ची भर पडून एकूण पारितोषिक निधी रु.८,२0,४५८/- इतका झाला आहे .या निधीच्या येणा-या व्याजाच्या रकमेतून गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येतात .

प्रमुख देणगीदार - १.सौ. निकिता प्रशांत सावे .-१0000/- २. सौ.लिना नरेश सावे - १0000/-

३ .सौ.विजया हेमंत सावे.- ५000/-

२ .विद्यार्थी सहाय्यक निधी :-

संस्थेकडे ३१ मार्च २0२0 अखेर रु.६,४३,४0१.५0/- विद्यार्थी सहाय्यक निधी जमा झाला आहे. या निधीच्या व्याजातून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप केले जाते.

३ .विज्ञान फंड :-

संस्थेकडे ३१ मार्च २०१९ अखेर रु.६६0६५/- इतका विज्ञान फंड जमा आहे. त्यात अहवालासाठी ३१ मार्च २0२0 अखेर रु.२५00/- ची भर पडून एकूण विज्ञान फंड निधी रु.६८५६५/- इतका झाला आहे. या फंडाच्या येणा-या व्याजातून विज्ञान मंडळाच्या विद्यमाने भरविण्यात येणा-या विज्ञान प्रदर्शनातील विद्यार्थ्यांच्या निवडक प्रतिकृतीस पारितोषिके दिली जातात. तसेच विज्ञान मंडळातर्फे घेण्यात येणा-या विविध स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना पारितोषिके दिली जातात.

४ .क्रीडा फंड :-

संस्थेकडे ३१ मार्च २0२0 अखेर रु.७६८७३/- इतका क्रीडा फंड जमा आहे. सदर फंडाच्या येणा-या व्याजातून क्रीडाक्षेत्रात विशेष नैपुण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येतात.

५ .इमारत निधी :-

संस्थेकडे ३१ मार्च २०१९ अखेर इमारत निधी रु.२,७५,४0,८६५.७२/- होता. त्यात अहवालासाठी शिक्षणप्रेमी जनता, आजी - माजी शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी व संस्थेचे सन्माननीय सभासद यांच्याकडून मिळालेल्या भरघोस देणग्यांद्वारे रु.१९,५९५९/- ची भर पडून इमारत निधी रु.२,७७,३६,८२४.७२/- इतका झाला.

अहवाल सालातील इमारत निधीसाठी देणगी देणा-या देणगीदारांची नावे खालीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| १.सौ.लिना नरेश सावे. | १,२३४५९/- |
| २.श्रीमती शितल सदाशिव ठाकूर | ३0,000/- |
| ३.सौ.भामिनी बाळकृष्ण जाधव | २0,000/- |
| ४.श्री.जीत कुमार चुरी | १0000/- |

५. श्री. श्रीरंग की. दातार १0000/-
६. श्री. केसरीनाथ नारायण सावे १0000/-
७. सौ. जयश्री यशवंत भंगाळे ५,000/-
८. श्री. निनाद गोपाळ सावे २५00/-

३१ मार्च २0२0 अखेर रु. १८,७७,२९0/- इतका शिक्षण फंड जमा आहे.

**१. शालांत परीक्षा :-**

**रा. हि. सावे विद्यालय:-**

मार्च २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाण परीक्षेस विद्यालयातील २२१ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. त्यापैकी २१३ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल शे. ९६. ३८% लागला. विद्यालयातील कु. निरज जगन्नाथ राऊळ हया विद्यार्थ्याला शे. ९६. ४0 % गुण मिळवून विद्यालयात प्रथम आला. तसेच ९0% पेक्षा अधिक गुण मिळविणारे ७ विद्यार्थी व ८५% पेक्षा अधिक गुण मिळविणारे ८ विद्यार्थी आहेत. कु. निरज जगन्नाथ राऊळ तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्श न करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे.

**न्युक्लिअर फेन्ड्स स्कूल :-**

मार्च २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाण परीक्षेस विद्यालयातील ३१ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. त्यापैकी ३१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल शे. १00.00% लागला. विद्यालयातील कु. मेहेक मुबारक शेख हया विद्यार्थीला शे. ८८. ८0 % गुण मिळवून विद्यालयात प्रथम आली. कु. मेहेक मुबारक शेख व तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे.

**२. एच्. एस्. सी. उच्च माध्यमिक शालांत परीक्षा :- (विज्ञान व वाणिज्य)**

फेब्रुवारी २0२0 मध्ये घेण्यात आलेल्या एच्. एस्. सी. परीक्षेचा तसेच ह. दा. (भाऊसाहेब) सावे विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९८. ३६% लागून कु. मेहेकबानू शेख हि ८३.00% गुण मिळवून कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम आली. याबद्दल कु. मेहेकबानू शेख हीचे अभिनंदन !

फेब्रुवारी २0२0 मध्ये घेण्यात आलेल्या एच्. एस्. सी. परीक्षेचा तसेच ह. दा. (भाऊसाहेब) सावे वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ८८. ८८% लागून कु. दिपू माळी हि ९0.00% गुण मिळवून कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम आली. याबद्दल कु. दिपू माळी हीचे अभिनंदन !

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे

३.इमारत भाडे :-

संस्था शासनाकडून कोणतेही इमारत भाडे अनुदान घेत नाही. संस्थेच्या ताळेबंदामध्ये नमुद केलेले थकीत भाडे दरवर्षी टप्याटप्याने कमी करण्यात यावे.

४.संगणक व आयटी विभाग :-

संस्थेने विद्यार्थ्यांकरिता अद्ययावत संगणक लॅब ऊभारले आहेत. संगणक विभागात एकूण ९०  संगणक संच आहेत. सदर संगणक विभागातून संस्थेच्या सर्व विद्याशाखेतील सुमारे ३२०० विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. या सर्व संगणकावर इंटरनेट सुविधा पुरविण्यात आली आहे.

## ऋणनिर्देश

१.संस्थेचे सन्माननीय व स्थानिक अंतर्गत हिशोब तपासनीस श्री.मिलिंद भास्कर चुरी व श्री.संतोष भास्कर सावे, श्री.नंदकुमार मनोहर मेस्त्री यांनी स्थानिक हिशोब तपासनीसाची जबाबदारी चांगल्या रितीने व विना मोबदल्याने पार पाडली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

२. संस्थेचे सनदी हिशोब तपासनीस मे.हेमंत एन.चुरी बोईसर यांनी संस्थेचे हिशोब, आयकर रिर्टन फाईल इ.कामे माफक फी आकारून केली त्याबद्दल संस्था त्यांस धन्यवाद देत आहे.

३. सौ.लिना नरेश सावे यांनी इमारत निधीसाठी रु.१,२३४५९/- ची भरीव देणगी दिली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

४. श्री.दयानंद जाधव :- हिशोब तपासनीस

श्री.दयानंद जाधव यांनी तारापूर एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेच्या व सर्व विद्याशाखांच्या अंतर्गत हिशोब तपासनीसाचे काम आपला अमूल्य वेळ देऊन केले त्याबद्दल संस्था श्री.दयानंद जाधव यांची अत्यंत आभारी आहे.

५. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व फी मिळविण्याच्या हेतुने अनेक दात्यांनी दिलेल्या देणग्यांमुळे गरीब विद्यार्थी फंड वृध्दिंगत होत असतो. दरवर्षी या गरीब विद्यार्थी फंडाच्या येणा-या व्याजाच्या विविध स्पर्धामध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जातात. शैक्षणिक व आर्थिक मदतीबद्दल संस्था व विद्यालय दात्यांची अत्यंत ऋणी आहे.

अहवाल साली पारितोषिक निधी, विद्यार्थी सहाय्यक निधी, इमरत निधी, ज्युनिअर कॉलेज शिक्षण फंड, क्रिडा निधी, विज्ञान निधी व संस्थेने चालवलेल्या इतर उपक्रमांसाठी ज्या ज्या व्यक्तिंची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष या संस्थेस मदत केली आहे त्या सर्वांचे संस्था मन:पूर्वक आभार मानित आहे. यापुढेही त्यांनी संस्थेवर असेच प्रेम व लोभ ठेवावा ही अपेक्षा करीत आहोत.

सर्वांना पुन:श्च मन:पूर्वक धन्यवाद!